# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

*Special Issue*

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


**Volume-II, February 2019 (Special Issue)**


स्थापना १९६१
म.शि.प्र. मंडळाचे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission

✤ EDITOR IN CHIEF ✤

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

✤ GUEST EDITOR ✤

**DR. BALASAHEB JADHAV**

www.scholarsimpact.com

: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

International Multidisciplinary Online Research Journal

**Approved By UGC Journal No-41129**

**Volume –II, February, 2019**

# SCHOLARS IMPACT

**QUARTERLY**

An Internationally Indexed, Refereed, Peer Reviewed, Quarterly Online and Open Access Journal

**IMPACT FACTOR- 5.98**

## SPECIAL ISSUE

**ON**

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM: CHALLENGES AND OPPORTUNITIES"

*EDITOR IN CHIEF*

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

www.scholarsimpact.com

# UGC (CPE) SPONSORED

# ONE DAY INTERDISCIPLINARY

# NATIONAL LEVEL CONFERENCE ON

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM: CHALLENGES AND OPPORTUNITIES"

## 16th February, 2019

## -Organised By-

# Department of Political Science

M.S.P. Mandal's

# Shri Shivaji College, Parbhani.

| | | |
|---|---|---|
| 51. | दहशतवाद : लोकशाही समोरील आव्हान<br>प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ. महादेव गव्हाणे | 180 –181 |
| 52. | लोकशाही प्रक्रिया आणि भारतीय वास्तव<br>डॉ. श्रीकांत देशमुख | 182 –183 |
| 53. | भारतीय लोकशाही आणि संविधानिक मुल्य एक विश्लेषण<br>डॉ. डोंगरे एल. बी. | 184 –186 |
| 54. | भारत आणि दहशतवाद : समस्या, स्वरूप आणि उपाय<br>डॉ. कल्पना माणिकराव कदम, दुगमवार शिरीश लक्ष्मणराव | 187 –190 |
| 55. | भारतीय लोकशाही : संविधानीक मूल्य आणि वास्तव<br>राहुल भागवत गायकवाड | 191 –193 |
| 56. | लोकशाही एक राज्यपध्दती की मुल्यपध्दती !<br>प्रा. गीता सा. गिरवलकर शर्मा | 194 –196 |
| 57. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>प्रा. डॉ. आर. के. काळे | 197 –200 |
| 58. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>सहा. प्रा. इनकर विक्रम सोनाजी | 201 –202 |
| 59. | भारतीय लोकशाहीचे ऐतिहासिक पुर्नविलोकन<br>संतोष प्र. गुट्टे | 203 –204 |
| 60. | सत्तेचे विकेंद्रीकरण आणि महिला सहभाग<br>डॉ. माधव कदम | 205 –206 |

# (51) दहशतवाद : लोकशाही समोरील आव्हान

ज्ञानेश्वर बनसोडे
राज्यशास्त्र विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय, (स्वायत्त) लातूर

डॉ. महादेव गव्हाणे
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, (स्वायत्त) लातूर

लोकशाही हा आजचा सर्वाधिक लोकप्रिय शासन प्रकार आहे. लोकशाही हे इंग्रजी 'Democracy' चे मराठी भाषांतर आहे. ग्रीक शब्द Demos म्हणजे लोक आणि Kratia म्हणजे सत्ता या दोन शब्दापासुन Democracy हा शब्द तयार झाला. म्हणजेच ज्या शासनव्यवस्थेत लोकांची प्रत्यक्षाप्रत्यक्ष सत्ता असते, सत्तेत लोकांचा सहभाग असतो. ती लोकशाही होय. जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीत जनता केंद्रबिंदू मानुन प्रतिनीधीने जनहिताला प्राधान्य देऊन व्यवस्था चालवावी ही अपेक्षा असते. जनतेच्या संमतीनुसार चालणारे शासन म्हणजे लोकशाही शासन. लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही प्रमुख तत्वे सांगितले आहेत. समतेमुळे मानवनिर्मित विषमता नष्ट होते. सर्वांगीन विकासाची संधी प्राप्त होते. बंधुता म्हणजे सर्वजन राज्याचे समान घटक म्हणून वागणूक प्राप्त होते. त्यामुळे कायद्यासमोर व्यक्ती–व्यक्तीमध्ये भेदभाव करण्यात येत नाही. लोकशाहीने व्यक्तींना आपल्या अधिकाराची व कर्तव्याची जाणीव होते. लोक आणि शासनकर्ते जबाबदारीने कार्य करतात. लोकांचा विकास लोकशाहीतच होतो. म्हणून तिला कांही विचारवंत जीवनपद्धती असेही म्हणतात. आज भारत हे जगातील लोकसत्ताक देशामधील सर्वात मोठे राष्ट्र आहे. काळाच्या ओघामध्ये भारतीय समाजव्यवस्था पाश्चात्यांच्या चंगळवादाकडे आकर्षित झाल्यामुळे आणि नैतिक मुल्यांच्या होत असणाऱ्या ऱ्हासामुळे भारतीय लोकशाहीपुढे जी अनेक आव्हाने उभी आहेत. त्यापैकी या लेखात दहशतवाद या आव्हानाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आधुनिक काळात संपूर्ण मानवजातीला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत त्यात दहशतवाद ही प्रमुख समस्या आहे. दहशतवादाची समस्या एखाद्या राष्ट्रापूरती किंवा एखाद्या भागापुरती मर्यादीत राहिलेली नाही तर तीने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले आहे. आज जगातील प्रत्येक राष्ट्र दहशतवादाने प्रभावित आहे. कोणतेही राष्ट्र या समस्येपासून आज अलिप्त नाही. भारतासारख्या विकसनशिल देशात दहशतवादाची समस्या गंभीर बनली आहे. प्रत्येक राज्यात कमी–अधिक प्रमाणात दहशतवादाचा प्रभाव दिसुन येतो. भारतात दहशतवादाची समस्या नविन नाही. कालपरत्वे तिला हजारो वर्षाचा इतिहास आहे. आजच्या आधुनिक युगात राज्यपुरस्कृत दहशतवादाचे रूपांतर खाजगी संघटनात्मक दहशतवादात झालेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात कांही क्रांतीकारी संघटनाद्वारे हिंसेच्या माध्यमातून राजकीय परिवर्तन घडवून आणण्याचा विचार विकसित झाला. त्या विचाराने स्वातंत्र्यानंतर हिंसेचे व्यापक स्वरूप धारण केलेले दिसते. देशाच्या विकासासाठी शांतता महत्त्वाची असते. शांततेशिवाय प्र... होत नाही. पण दहशतवाद राष्ट्राच्या विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळा ठरतो.

दहशतवादाच्या समस्येचे अनेक पैलू आहेत. अनेक आयाम व अनेक कारणे आहेत. दहशतवादी नु... प्रकारचे आहेत. दहशतवादी कृत्यात अनेक लाखो निष्पाप लोकांचे बळी गेले. मालमत्तेचेही ने... सगळ्याच हशतवादी हल्ल्यात हे कमी–अधिक प्रमाणात घडते. बेन्जामिन नेत्याहून या इस्त्राईली ने... आपले उद्दिष्ट साध्य करण्याठी निष्पाप लोकांची जाणून–बुजून आणि पध्दतशीरपणे केलेली हत्या... करून त्यांच्या अवयवांची केलेली भीषण मोडतोड म्हणजे दहशतवाद, तर सन झू या चीनी... हजार वर्षापूर्वी म्हटले की, 'Kill one, Frighten Ten Thousand' म्हणजे एकाला मारा आणि ... करा, हा दहशतवादाचा प्रमुख उद्देश असतो. आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हिंसेच... जातो. शस्त्रांच्या हिंसेच्या धाकाने कोणासही नमविता येऊ शकते, असा त्यांचा विश्वास... आपले ठरलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिंसा हे सर्वात प्रभावी माध्यम होय. असा... असतो. हिंसा ही अनिवार्य आहे ती कराविच लागते. ती टाळता येऊ शकत नाही. ... असे दहशतवादी मानतात. हिंसेचे समर्थन करण्यासाठी ऐतिहासिक घटनांचा सं...

प्रथम प्रयत्न केले. त्यामुळे कांहीच साध्य झाले नाही म्हणून नाईलाजाने आम्ही हिंसक दहशतादी पध्दतीचा स्विकार केला असेही समर्थन दहशतवादी संघटनांकडून केले जाते.

दहशतवादाचा कोणताही धर्म नसतो. ती एक प्रवृत्ती असते हे जरी सत्य असले तरी धर्माच्या आधारावर दहशतवाद पोसला जातो. जिहादला पवित्र युध्द समजणे चुकीचे ठरते. अरबी भाषेत जिहादचा अर्थ संघर्ष असा होतो. आत्म्याच्या नकारात्मक भूमिकेच्या विरूध्द केलेल्या संघर्षाला महंमद पैगंबरानी जिहाद म्हटले होते. परंतु आधुनिक काळात शासनकर्त्यांनी, दहशतवाद्यांनी त्याचा अर्थ धर्मसंघर्ष असा लावल्यामुळे आता हा संघर्ष सांस्कृतीक व धार्मिक बनला आहे. व्यक्तीस्वातंत्र्य, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे दहशतवादी संघटनांना मान्यच नसते. स्वातंत्र्य हाच त्यांना फार मोठा अडथळा वाटतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्याला या संघटना विरोध करत असतात. पण हे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांना स्वतःला मिळालेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. दहशतवादी संघटनांनी आपला हेतु साध्य करण्यासाठी साम–दाम–दंड–भेद अशा सर्वच मार्गांचा अवलंब करतात, साध्य महत्त्वाचे असते. साधने कोणतीही व कशीही असली तरी हरकत नाही हे सूत्र सर्व दहशतवादी संघटनांचे समान असते. आपले विचार इतरांवर लादणे, आपल्या म्हणण्यानुसार इतरांना वागण्यास भाग पाडणे हे साध्य करण्यासाठी दहशतीचा मार्गच योग्य आहे असे त्यांचे मत असते. शत्रुला नष्ट करण्यासाठी जे–जे करावे लागेल ते–ते केले पाहिजे व तसे करणेच योग्य आहे, असा विश्वास असतो. कायदा, न्याय, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही मूल्य यांची त्यांच्याकडून होणारी पायमल्ली योग्य मानली जाते. दहशतवादी संघटना आपले ध्येय साध्य करण्यासाठी संहारक शस्त्रास्त्रे प्राप्त करीत असतात. त्यासाठी लागणारा पैसा ते अंमली पदार्थांच्या व्यापारातून मिळतात. या पैशांच्या मदतीने शस्त्र मिळवणे व त्या शस्त्रांचा उपयोग करून सत्तेतले सरकार उलथून टाकणे, आपल्या मर्जीतील सरकारला सत्तेवर आणणे, आपल्या मागण्या मान्य करून घेणे, सत्ता प्राप्त करणे, त्यासाठी हजारो निष्पाप माणसांचा बळी घेतला जातो. दहशतवादाचे मुख्य सुत्र असते. एका निरपराध माणसाला ठार करा आणि हजारोंच्या मनात दहशत निर्माण करा. त्यांच्या या कार्यामुळेच लोकशाहीची सर्व मूल्ये पायदळी तुडवली जातात. दहशतवादी संघटनेत सामील होणे सोपे असते परंतु बाहेर पडणे अवघड असते. मायकेल ऊर्फ बोम्मी ब्राऊमन हा दहशतवादी नेता असे म्हणतो की, 'दहशतवादातून बाहेर पडण्याचा मार्ग स्मशानातून जातो.' खरं म्हणजे दहशतवादी जन्माला येत नसतात, ते विशेष सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीतून निर्माण होत असतात.

आधुनिक काळातील दहशतवादाचे स्वरूप हे अत्यंत चिंताजनक आहे. जवळजवळ प्रत्येक देशात कोणत्या ना कोणत्या दहशतवादी गटाचे आज अस्तित्त्व आहे. दहशतवादी संघटनांचे आपापसात सहकार्य असते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, शस्त्रास्त्रे व अमाप पैसा असल्यामुळे या दहशतवादी संघटनांचे सामर्थ्यदेखील आज प्रचंड आहे. काही दहशतवादी संघटनांना राज्यसत्तांचा पाठिंबा असल्याने त्यांच्या सामर्थ्यात वाढच झाली आहे. माहिती व सुसंचन माध्यमातील तंत्रज्ञानाचा या गटाद्वारे पुरेपुर प्रमाणात वापर केला जातो. लोकसंख्यावाढीमुळे सर्वांना संरक्षण देणे हे राज्यसत्तेला अशक्य होऊ लागले आहे. त्यामुळे दहशतवादावर नियंत्रण ठेवणेही कठिण होत चालले आहे. कोण, कधी, कोठे बॉम्बस्फोट करेल आणि कोण, कधी, कोणत्या बॉम्बस्फोटात कोठे मृत्युमुखी पडेल हे सांगता येत नाही. अशी परिस्थिती आजही आहे. त्यामुळेच दहशतवादाच्या समस्येकडे गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

दहशतवाद समुळ नष्ट करण्यासाठी सर्वपक्षीय सहकार्य हवे. राष्ट्रहिता करीता एकदिलाने दहशतवाद विरोधी मोहीम राबवावी स्वातंत्र्य, समता व न्याय यावर उभी असणारी भारतीय लोकशाही दशहतवादापासुन वाचविण्यासाठी महात्मा गांधीच्या सत्य, अहिंसा, साध्य–साधन शुचिता या विचाराची गरज आहे. दहशतवादाविरूध्द संघटीतपणे उभे राहण्याचे आत्मिक सामर्थ्य, आत्मविश्वास, धाडस जनतेत निर्माण करणे आवश्यक आहे. आज भारतासहित संपूर्ण जगाला 'युध्दाची नव्हे गांधीजींच्या विचाराची' खरी गरज आहे.

संदर्भ सुची :

1) प्राचार्य डॉ. बाळ कांबळे (संपा.), भारतीय लोकशाही समोरिल आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2012.
2) डॉ. राजशेखर सोलापूरे (संपा.), राजकीय सिध्दांताची रूपरेषा, अरूणा प्रकाशन, लातूर, 2018.
3) प्रा. नागोराव कुंभार (संपा.), भारतीय राजकारण : दृष्टीक्षेप प्रबोधन प्रकाशन, लातूर, 2002.
4) गिरीश कुबेर, धर्मयुध्द, राजहंस प्रकाशन, पुणे, 2009.
5) य.दी.फडके, राजकीय दहशतवाद, अक्षर प्रकाशन, मुंबई, 2000.
6) म.न.उदगावकर, एकविसाव्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लीकेशन, पुणे.
7) डॉ. वा. भा. पाटील, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव, 2015.
8) डॉ. बी. डी. तोडकर, भारत आणि जग, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, 2010.
9) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारत आणि जग, सकाळ प्रकाशन, पुणे, 2015.
10) उपाध्याय सौरभ, भारत में आतंकवाद, हशिका पब्लीकेशिक हाऊस, जयपूर, 2011.